!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७५ ०७-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# जागतिक महिला दिनानिमित्त मंगळवारी प्रदर्शनाचा समारोप, किचन फायर सेफ्टी प्रात्याक्षिके, दामिनीपथक व महिला पत्रकारांचा सत्कार

**संभाजीनगर ( ता. ०७ ) :** रश्मी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मातोश्री महिला बचतगट महासंघ व शिवसेना संभाजीनगरच्यावतीने कैवल्य महिला बचत गट व वाघिनी महिला बचत गट यांच्या सहकार्याने जागतिक महिला दिनानिमित्त गजानन महाराज मंदिराच्या बाजूच्या कडा मैदानात सुरु असलेल्या बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंची विक्री व प्रदर्शनाचा समारोप मंगळवारी सायंकाळी ८ वाजता मातोश्री महिला बचत गट महासंघाच्या सहसचिव रंजना नेवाळकर, मुंबईच्या माजी नगरसेविका रिद्धी धुरी,महासंघाच्या ताडदेव विभागीय संचालिका लतिफ़ा पाष्के, महासंघाच्या दहिसर विभागीय संचालिका अर्चना नाईक, वैजयंती खैरे,माजी महापौर कला ओझा, माजी महापौर अनिता घोडेल, सुनिता देव, विजया शिरसाठ यांची यावेळी प्रमुख उपस्थिती पार पडणार आहे

जागतिक महिला दिनानिमित्त सायंकाळी ७ वाजता किचन फायर सेफ्टी, महिलांसाठी आगीपासुन घ्यावयाची काळजी यासंबंधि प्रात्यक्षिके श्री मांडवकर सादर करणार आहे.यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दामिनी पथक व महिला पत्रकारांचा सत्कार शिवसेना संभाजीनगरच्या वतीने करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास पालकमंत्री रामदास कदम, शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे,संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, आमदार संजय शिरसाट, सहसंपर्कप्रमुख अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, प्र. जिल्हाप्रमुख सुहास दाशरथे, नरेंद्र त्रिवेदी, महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल, महापौर त्र्यंबक तुपे, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, बंडू ओक, शहर प्रमुख राजू वैद्य, संतोष जेजुरकर, बाळासाहेब थोरात, जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहुन प्रदर्शनास मोठया संख्येने भेट देण्याचे आवाहन मातोश्री महिला बचत गट महासंघ जिल्हाकार्यकारिणीच्या जिल्हासंघटक रंजना कुलकर्णी, मुक्ता खैरे, नलिनी बाहेती, अंजली मांडवकर, दुर्गा भाटी, मंजुषा नागरे, अनुपमा कुलकर्णी, मिना बेलसरे, मिना तांबोळी, रश्मी ढापरे, प्रज्ञा गिरधारी यांनी केले.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525